धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________ दिनांक : १५/०१/२०१५

# ढोकाळी/मनोरमा नगर येथील नाना-नानी पार्क महानगरपालिकेकडे हस्तांतरण व सार्वजनिक वापरास खुले करण्यासाठी 'धर्मराज्य पक्षा'चा पाठपुरावा

**प्रतिनिधी**

दि. १५ - **ढोकाळी/मनोरमानगर रोडवर** असणारे **नाना-नानी पार्क** हे सुविधा भुखंडावर विकासकास विकास करण्यास देण्यात आले होते. त्याचे हस्तांतरण विकासकाकडून महानगरपालिकेकडे आज रोजी सुध्दा झालेले नाही. विकासकाने २०१० साली महानगरपालिकेस ताबा घेण्यास पत्र दिले होते. परंतु महानगरपालीकेने त्याचा ताबा घेतलेला नसल्यामुळे विकासकाने विकास केलेले पूर्ण गार्डन बेवारस स्थितीत सोडलेले आहे. विकासकाने पार्कच्या आतील बाजुस एक कडेला असणाऱ्या मोकळया जागेत कामगारांसाठी तात्पुरती झोपडपट्टीवजा घरे बांधुन दिली होती, तेथे कामगार व त्यांचे कुटुंब राहत होते. ते कामगार पार्कचा गैर वापर करीत होते, पार्कमध्ये असणाऱ्या नळाचा वापर स्वत:साठी, तसेच उघड्यावर आंघोळ करण्यासाठी करीत होते. महिलासुध्दा उघड्यावर आंघोळ, धुणीभांडी करत होती. तेथेच राहत असल्यामुळे कामगार पार्कचा वापर २४ तास हवा तसा करीत होते. पार्कमध्ये पूर्वी सुरक्षा रक्षक होता. परंतु गेल्या काही महिन्यांपासून सुरक्षा रक्षक नाही. त्यामुळे पार्कमध्ये कुठलीही मुले वेळी अवेळी येऊन खेळत असतात व पार्कचे नुकसान करतात, परंतु त्यांच्यावर कुठलेही नियंत्रण नसते. माहिती अधिकाराअंतर्गत मागविलेल्या माहितीनुसार सदर नाना-नानी पार्कच्या भूखंडाचा ७/१२ सुध्दा महानगरपालिकेच्या नावे झाला आहे, असे असतानाही महानगरपालिकेने सदर भूखंड आपल्या ताब्यात घेतला नाही व तो सार्वजनिक वापरास खुला केलेला नाही. याबाबींकडे 'धर्मराज्य पक्षा'तर्फे वारंवार पत्रव्यवहाराद्वारे महानगरपालिकेचे लक्ष वेधले असता, महानगरपालिकेने केलेल्या कारवाईत केवळ नाना-नानी पार्कच्या आतील बाजुस असलेल्या विकासकाने ठेवलेल्या कामगारांच्या झोपड्या हटविण्यात आल्या आहेत. महानगरपालिकेने केलेल्या कारवाईमुळे, सदर नाना-नानी पार्कवर विकासकाचे असलेले नियंत्रण पूर्णता काढून घेतले आहे, त्यामुळे सदर पार्कच्या दुरावस्थेत आणखीनच भर पडली. त्यामुळे पार्कमध्ये दिवसभर क्रिकेट खेळणाऱ्या मुलांमुळे, पार्कमधील हिरवळ नष्ट होऊन; तेथे धुळीचे वातावरण तयार झाले आहे. सदर पार्कमधील झाडांना पाणी नसल्यामुळे पाण्याअभावी ती मृत झालेली आहेत. तसेच मोकाट जनावरांच्या वावरामुळे सद्या अस्तित्वात असलेली झाडेसुध्दा नष्ट होण्याची शक्यता आहे. विजेची सोय नसल्यामुळे सदर नाना-नानी पार्क हे एक निर्जन स्थळ बनले आहे. त्यामुळे दिवस-रात्र तेथे अनैतिक कारभार चालतात, तसेच सदर ठिकाण हे दारूड्यांचा अड्डा बनलेला आहे. त्यामुळे शेजारी असणाऱ्या रहिवाशी सोसायट्यांनासुध्दा त्याचा त्रास होत आहे. भविष्यात या ठिकाणी लैंगिक अत्याचार अथवा खून यासारखी घटना घडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या परिसरातून जाण्यास महिला व वृध्दांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर नाना-नानी पार्क त्वरीत महानगरपालिकेने ताब्यात घ्यावे, तसेच ते वयोवृध्द नागरिकांच्या सार्वजनिक वापरासाठी खुले करण्यात यावे व त्याची योग्य ती सुरक्षा व देखभालीची व्यवस्था करावी, तसेच उर्वरित सुविधा भुखंड महानगरपालिकेने त्वरीत ताब्यात घेऊन तो पार्कशी जोडण्यात यावा, या मागण्यांसाठी **'धर्मराज्य पक्षा'**तर्फे **दि. ४/०३/२०१४ रोजी मा. सहाय्यक आयुक्त, उद्यान विभाग, मानपाडा/माजिवडा प्रभाग समिती** व **दि. ३०/०७/२०१४ रोजी मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका** यांना पत्रव्यवहार करण्यात आला तसेच संबंधित विभागाशी प्रत्यक्ष भेट देऊन हा विषय निकाली काढण्यासाठी प्रयत्न केला गेला, परंतु सदर विषयावर आजतागायत कोणतीही योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरी सदर विषय प्रकरणी कार्यवाहीस दिरंगाई करण्याऱ्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी व वरील विषय तत्काळ योग्य त्या प्रकारे हाताळून नागरिकांस योग्य तो न्याय द्यावा, या मागण्यांसाठी **दि. १४ जानेवारी-२०१४** रोजी कार्यकारी अभियंता, शहर विकास विभागास सदर ठिकाणाच्या दुरावस्थेसंबंधीच्या फोटोसहित निवेदन देण्यात आले.

यावेळी धर्मराज्य पक्षाचे ठाणे शहर अध्यक्ष **सचिन शेट्टी,** ठाणे शहर उपाध्यक्ष **जगन्नाथ सलगर,** ढोकाळी/मनोरमा नगर प्रभाग अध्यक्ष **मंगेश लाड, नितीन वायदंडे** आदी पदाधिकारी व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

ए/ए२०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस्
को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२,
ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग,
द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०.
दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*"सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!"...*